म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. ५१
१९२०

REFBK-0001806

REFBK-0001806

स. ग्रं. मं. ठाणें
विषय कविता
नं. ५२


बिली अंकांतून प्रसिद्ध झालेली कविता.

विजे । मग पडे तरी माथा तुकिजे ॥
झे ? । बालका माय ॥

—श्री ज्ञानेश्वरी. अध्याय ११-वा.

# पुण्याची पर्वती.

[ सचित्र ]



अनंततनय.

[ सार्वजनिक सभेच्या ज्युबिली अंकांतून प्रसिद्ध झालेली कविता ]

# पुण्याची पर्वती.

[ पोवाडा ]

लेखक

दत्तात्रेय अनंत आपटे

प्रकाशक

शंकर नरहर जोशी.

[ सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन. ]


आवृत्ति पहिली

REFBK-0001806

शा. श. १८४२

किंमत चार आणे


शंकर नरहर जोशी यांनीं, १०२६ सदाशिव पेठ, पुणें
येथे आपल्या 'चित्रशाळा स्टीम प्रेस' छापखान्यांत
छापून प्रसिद्ध केलें.



श्रीपर्वती येथील श्रीदेवदेवेश्वराच्या देवालयाचा देखावा.



श्रीकार्तिकस्वामीचें मंदिर.



श्रीविष्णूचें देवालय, ( श्रीपर्वती, पुणें. )

# पर्वतीच्या पहिल्या पायरीवर.

इ. स. १९१७ मध्यें, एका उदारधी, भाविक पण सहृदय रसिक राजपुरुषानें, प्रस्तुत लेखकास पुण्याचे पर्वतीवर एक कविता लिहावयास सांगितली होती. प्रस्तुत पुस्तक हें त्या आज्ञापालनाचे दृश्यस्वरूप होय. आज्ञापक भक्तिमय अंतःकरणाचे असल्या कारणानें त्यांना कशा प्रकारची कविता पाहिजे याची लेखकास चांगली जाणीव होती. त्यांच्या वृत्तीशी समरस होऊन कविता लिहावी या हेतूनें पर्वतीला सारख्या खेट्या घातल्या, तरी वृत्ति उल्हासित होईना व कांहीं केल्या जम बसेना! अखेर एके दिवशीं 'वयपरत्वें बुद्धीला जाड्य येतें. तुमचें काव्यकौशल्य गारठल्यासारखें दिसतें' असे शब्द ऐकून घेण्यापर्यंत पाळी आल्यावर आत्मवंचना न होऊं देतां आज्ञापालनाचें कार्य तडीस नेण्याचा संकल्प केला व त्याप्रमाणें गेल्या शिवरात्रीस कविता लिहिली; आणि श्रीमंतांनीं व त्याप्रमाणें इतर पुष्कळ सहृदय कविमित्रांनीं प्रस्तुत कविता पसंत पडल्याचें दर्शविल्यावरून ती आज महाराष्ट्रास या स्वरूपांत सादर करीत आहे.

प्रस्तुत कविता ऐतिहासिक स्वरूपाची असतांहि वाचकांस प्रसंगविशेषीं विपर्यास झालेला आढळेल परंतु कै० हरिभाऊ आपटे यांचे "काव्याचें सर्व रहस्य सत्यांत नाहीं, तर सत्याभासांत आहे. इतिहासाचें रहस्य सत्यांत आहे, इतिहास लिहिणारानें अणूभरहि सत्यापासून चळतां कामा नये. कवीस प्रत्यक्ष सत्याची अपेक्षा नाहीं, सत्याभासाची अपेक्षा आहे." [ विदग्ध वाङ्मय पृ० ५६ पहा ] या शब्दांकडे दृष्टि ठेवून कविता वाचल्यास इतिहासाचा विपर्यास केला आहे असें म्हणण्याची पाळी येऊ नये असें वाटतें.

शेवटीं ज्या हृदयस्थ जनार्दनानें, परम मंगल परमात्म्यानें प्रस्तुत पुस्तकांतील हें शब्दचित्र काढविलें, त्याला अनन्यभावें शतशः प्रणाम करून व पर्वतावरील श्रीदेवदेवेश्वराचे चरणीं तें समर्पून हें हृदयनिवेदन आटोपतों.

१९३, बुधवार पेठ पुणें.
चैत्र शु० प्रतिपदा शके १८४२.

सर्वांचा कृपाभिलाषी,
**अनंततनय.**

# पुण्याची पर्वती.

चाल:—पोवाड्याची.

१

स्मशानवासी विघ्नविलासी विभवविनाशी उमापती,
सपार्वती ज्या वसे पर्वतीं तया पर्वती जन म्हणती. ध्रु०
धनी शिकंदर, विलाससुंदर, राज्यधुरंधर नानांनीं,
पुण्यग्रामा रूपा आणुनि केली अपुली नृपधानी;
शौर्यशालिनी समरखेलिनी महाराष्ट्रभूहृदयमणी,
पुण्यपुरी ही भली वसविली 'दख्खनची' म्हणती 'राणी;'
भयार्तसंजीवनी मानिनी मर्द मराठ्यांची जननी,
सुहासिनी सद्भाग्यशालिनी लावण्याची नव खाणी;
मग तिचे दक्षिणेकडे,
सह्यगिरि-कडे,
बघुनि रांकडे,
बांधवोनि देउळवाडा,
नाहिं सान नाहीं गाढा,
स्थापिला देव नागडा,
न कळे कोणीं कुण्या मुहूर्ती दिली तयातें ही सुमती!

२

काळि गंडकी शिळा चकाके जींत पाहतां रूप दिसे,
श्रीविष्णूची मूर्ति घडविली बघतां जीवा जडे पिसें;

दक्षिणभागीं महेश्वराचें बांधुनि देवालय सान,
ज्येष्ठसुमासीं व्रजवनवासी तिथ स्थापिलें श्रीरमण;
देव पूजिल्या दैव न चुकतें पानिपतीच्या रणांगणीं,
भाउ हरपला, पुत्र निमाला, अघटित दैवाची करणी !
नउ लाख बांगडी फुटली,
शोणितीं न्हाली,
भूमि त्या कालिं,
ढवळ्याचे शेजारास,
बांधितां पोवळा त्यास,
वाण न गुण लाग खास,
स्मशानवासी कसा होय हा वृंदावासी रमापती ?

३

जवामर्दिचें शिक्षण द्याया महाराष्ट्रिच्या बाळांना,
सचिव रमाधव तेजःसंभव विचार अभिनव करि नाना;
निर्दय पशुपति विलासि यदुपति हे न लाधले देव इथें,
सुरसेनानी, कार्तिक मानी तोचि रक्षिता समयातें;
पौरुष्याची षडाननाची मूर्ति करवुनी नवलाची,
मंदिर बांधुनि करि जों अर्चा परमोत्साहें यथारुची;
क्षयरोग माधवा जडे,
मनीं चरफडे,
नावरे रडें,
जावोनि थेउरामाजीं,
नेउनी गणेशा फर्जी,
गुजरिली गुहावर अर्जी,
व्यर्थ होय तें मुके जिवा तो; जाय त्यासवें रमा सती !

---

१. श्रीविष्णूची स्थापना इ. स. १७५८ त झाली व पुढें अवघ्या तीन वर्षांनीं म्हणजे इ. स. १७६१ त पानिपतचें युद्ध झालें.

१८०६

४

पुण्यदंपतीं रमा-रमापति-शापें पुढती एकादिनीं,
स्कंदमंदिरावरी कोसळे लोळ विजेचा कडाडुनी;
मूर्ति भंगली मंदिर पडलें. सदन जळालें निमिषांत,
भोंड्या भिंती अजुनि देती साक्ष परि त्या डोळ्यांत !
अश्रु ढाळितां रडू ओसरे; हुंदके स्फुरुन मरुन नसे,
दग्ध कोमलता, पाउस जातां गगन उसासे देत बसे !
आणुनी मूर्ति गोजिरी,
सुखद साजिरी,
स्थापिली जरी,
जें जाय विभव एकदां,
भंगली शुक्र-संपदा,
सांधितां काय ये कदा ?
भरल्या गोकुळिं अकाळाइचा फेरा आला ! कालगती !

५

छत्रपतींच्या वजिरानीवर जिथें चमकलें मानधन,
एकापेक्षां एक विचक्षण वीरमणी कीं नयनिपुण;
दैव आमुचें ! रत्न माधव त्या गादीचे थाजाया,
धाने जे झटले, सदैव अमुलें देह-कारणें राखाया;
सवाई बाजी, भोजन-बाजी, भिक्षुक-मठजी-पोशिंदे,
साळुसखूंचे त्रिमोठमींचे बावनखणींचे साजिंदे !
युद्ध जुंपतां खडकीला,
बघुन बमला,
त्या समयाला,

---

१. कार्तिकेयाचे मंदिरावर इ. स. १७९१ त वीज पडून तें जाया झालें.

२. श्रीविष्णूचे दक्षिण व पश्चिम बाजूला एक चतुष्कोणी वाडा होता. हा वाडाहि वीज पडूनच इ. स. १८१६ त जळाला !

उमापतीचे पायाशीं,
लावुनि दुर्बिण डोळ्यांशीं,
स्वजनप्रेतांच्या राशी,
भला प्रजापति दिला उमापति! अभिधा पशुपति सार्थचि ती !

६

सभोंवताली दृष्टि फेंकिली जरी विचक्षण घडीभरी,
गतकाळींचें विनष्टवैभव अश्रु लोचनीं उभे करी !
जल पुरवाया नगरवासियां तळें निर्मिलें पायतळीं,
मंगलदायक सिद्धिविनायक वसे जलाशयिं सुनिर्मळीं;
क्रीडानौकेमधें बसोनी सवाइ माधव महादजी—
नानासह नृपनिति खेळले या तळ्यांत सहजासहजीं;
आजला तळें आटलें,
रान माजलें,
गवत उगवलें,
पाण्याचा टिपुसहि नुरला,
डोळ्यांला लावायाला,
प्रगतीचा गाडा आला,
त्या पाण्यासह पाणि पुण्याचें गेलें बोले वृद्ध-तती !

७

स्मर-रण-रंगीं समसुखभोगी राजयोगि कीं तो बाजी,
समरामाजीं केवळ गाजी सदा शिपाई ज्या राजी;
अनन्यसुंदर अशी तयाची सखी जिवाची विलासिनी,
मनोमोहिनी मधुरभाषणी मदमस्तानी विनोदिनी;
तत्सुखसंगीं दंग जोंवरी रंग न भंगो धरुनि मनीं,
उपवन अनुपम, नंदनवनसम, निर्मी नामें 'मस्तानी'
त्यापुढें बाग दूसरा,
अजब नव तऱ्हा,

नाम ज्या 'हिरा,'
बांधिला पंत नानांनीं,
धोरणी राजकारणी,
गाजे कीर्ती अशी जनीं,
बाप[1]से बेटा असा सवाई उणा न एकहि पाव रती !

८

मंगलकार्यीं विप्रभाजनें सतत पूर्वि ज्या स्थलिं व्हावीं,
सुमंतं येता परराष्ट्रींचें तयांस जाफत कीं द्यावी;
विबुधांकरवीं वसंतोत्सवीं सायंकालीं पुढें पुढें,
स्वबंधुसाठीं ज्ञानसुधेचे माधव[2] घाली जिथें सडे;
मंत्र्यांसंगें किंवा व्हावीं जिथें खलबतें एकांतीं,
सखीसंगतीं तिथें पारवे आज मसलती परि करती !
सोमाचे स्थलिं त्या किती,
पाट वाहती,
सदा संप्रतीं,
चेंडुफळी किंवा कोणी,
लुसलुशीत मउ हातांनीं,
खेळती धांव धांवोनी,
चहा बिस्किटें, कांदाचिवडे जलसे यांचे किति झडती !

९

इचलकरंजी संस्थानींचे व्यंकटराव घोरपडे,
दानशूरता–यशोदुंदुभी ज्यांचा आजहि कानिं पडे !

---

१. जसा मस्तानी बाग बाजीरावांनीं आपल्या रखेलींकरितां बांधिला तसाच त्यांच्या मुलानें म्हणजे श्री. नानासाहेबांनीं 'हिराबाग' आपल्या रखेलीकरितां बांधिला अशी आख्यायिका आहे; व तिलाच उद्देशून प्रस्तुत ओळ योजिली आहे. २ कै. न्या. मू. माधव गोविंद रानडे.

राजभगिनी सुगुणशालिनी अनसूया ती जणुं दुसरी,
त्र्यंबकरावा वरी विवाहीं; हरिविण लक्ष्मी कुणा वरी ?
समीपवर्ती विलसे त्यांचा बागबगीचा मनोहर,
श्रांत मना विश्रांति लाधते प्रेमें बघतां घडीभर !
उमापतींची दृष्टि परी,
पुरी विषारी,
पडे जयावरि,
तयास लघुना कशीवशी-
येणें; ठरली रीति अशी,
अनसूया† मग सुटे कशी ?
देउनि अनुमति, तोतयास ती, पडे फशीं नयमती सती !

१०

समोर भिंती उघड्या दिसती स्थलासि म्हणती त्या रमणा,
वांटित होते धन द्विजांना श्रावणांत जेथें नाना;
धर्म मांडतां कर्म राहिलें उभें कांहिं सालीं एका,
पर्जन्याची वृष्टि जाहली सुरू अचानक धुमधडका;
वेदोभास्कर पळूं लागले, शिव जाहले कुडकुडले,
पडले, झडले, परि अडखळले, जलीं बुडाले गडबडले !
'-धर्म काय हा शकाला-
नाहीं रुचला ?-'
वदुनि समयाला,

---

† इ. स. १७६६ त. सदाशिवराव भाऊंच्या तोतयाची चौकशी झाली तेव्हां श्री. अनुबाई पुण्यांतच होत्या. तो तोतया नसून भाऊसाहेबच असावा असें अनुबाईचें मत होतें व त्यांची भ्रांति दूर करण्यासाठीं श्रीमंतांनीं त्या तोतयास अनुबाईंचे वाड्यांत कांहीं दिवस ठेविले होतें परंतु त्यांचा भ्रांति शेवटपर्यंत दूर झाली नाहीं, ती नाहींच ! श्री. अनुबाईंच्या हातून हें जें अविचाराचें राजकारण झालें तेणेंकरून त्यांचें फार नुकसान व दुर्लौकिक झाला. त्यावेळीं त्यांचें सर्व संस्थानच खालसा व्हावयाचें परंतु नाना फडनवीस यांनीं केवळ त्यांच्या वृद्धापकाळाकडे लक्ष देऊन तसें केलें नाहीं. इतकेंच.

नृपवृक्षीं त्यजुनी सार्गी,
नानांची बसली स्वारी,
मांडुनी ठाण निर्धारी,
पाउस गेला, भानु चमकला, नवलपराई चमत्कृती !

११

सिंहगडाचें अभिमानाचें, विमल यशाचें शिखर महा,
दिसे येथुनी, झुकता गगनीं, नीट न्याहाळोन जरा पहा;
मस्तागिरीला जयें लाविला उदयभानु ना यवनांचा !
शिवरायाचा, सखा जिवाचा, शेलारचा त्या भाचा !
सिंह मावळा, नो वनमाळी, करवंदिच्या जाळीत,
दिसे पहुडला तीक्ष्ण दाढेनें पापी हृदया जाळीत !
पाय पांढरे उमापते—[2]
लागतां इथें
तुझे वाटतें,
त्याच धुरंधर सिंहाचे,
महाग झाले हे बच्चे.
वस्त्रान्ना या ही साचे,
सतिचे द्वारीं वत्ती, झुकती असती-द्वारीं परि हत्ती !

१२

वानवडिच्या चतुःश्रृंगिच्या अफाट उघड्या मैदानीं,
डेरे देउनियां दल्बादल् जिथे दिसावे वीरमणी,
शिंदे होळकर समरधुरंधर स्वामीचे केवळ दौलतिचे;
भाले पेलित सदा बसावे शिपाइ निधड्या छातीचे;

१ सूर्य, पक्षीं नाना फडनीस. २ इ. स. १८१७ त खडकीची लढाई निश्चित झाल्यावर पर्वती वरील सर्व जामदारखाना देवदेवेश्वरांच्या मूर्तीसह सिंहगडावर नेऊन ठेविला. अर्थात् सिंहगडाला पर्वतीवरील देवाचे पाय लागतांच सिंहगडाचे ढापूंतील मावळी प्रजा वस्त्रान्नास महाग झाली अशी कल्पना केली-

तिथें आजला स्वैर हिंडती तिसऱ्या प्रतिचे सरदार
चष्मे घालुनि वरचष्म्यानें नव्या दम्याचे बहाद्दर;
ज्ञाहलें छातिचें खोकं,
कटीला पोक,
तरीही झोंक,
वायुधूत केश सारिती,
किडकिडित कांठि फिरविती,
तोंडांनिं शीळ घालिती,
गांव आजचे हे दौलतिचे ! देवा ! डोळे डबडबती !

१३

डोळे उघडुनि दिसे पाहतां असा भोंवतां अंधार,
तरीहि म्हणती प्रकाश गाढा ! खूप शांतिचे बिलंदर !
अतिवृष्टीनें अनावृष्टिनें देश जाहला वैराण,
अध्यापाटीं प्रजा वावरे सर्वपरींनीं हैराण !
डोळे ताणुनि धूर्त धोरणी धीटपणाच्या गुर्मीनें,
म्हणती रडता भरती असतां महानुभावी कपटानें !
खरें तयांचें हें म्हणणें,
नाहीं वदणें,
लाजिरवाणें,
तोंड दाबुनी वरी बुके-
देती मारुनि धरम् धके,
बलिष्ठनीती अशी विके,
शेळी जातां जिवानिशीं कीं म्हणती खावू वातट ती !

१४

पाठीमागें मावळतीला† ध्यान देउनी पहा जरा,
विठ्ठलवाडी जुनी पुराणी हिंगण्याची ती नवी तऱ्हा !

† पश्चिमेला.

अनाथ अबला विधवा बाला, यानां घालुनि नवे धडे,
मैत्रेयी कीं गार्ग्यी यांचें पुनरुज्जीवन आज घडे;
पहा मुठेचें धरण कसें तें अल्लडपोरीपरी पळे,
घाली विळखा या दरडीला, परी मेखला तिला मिळे !
भारतसेवकसमितीचें,
सुविलासाचें,
गृह मौजेचें,
भारतसेवा कशी किती,
घडते त्यांना ठाउक ती,
वाक्कुशलांची ही वसती
पोरें सोरें म्हणति; जाउं द्या; बोलुनि चालुनि अल्पमती !

१५

शेजारीं तें कला शिकवितें विद्यामंदिर[1] पलीकडे,
तशींच तिकडे गंगमुखीला[2] अणीक दिसती दोन[3] पुढें;
उंची शिक्षण इथें लाधतें आजकालच्या बाळांना,
कंठरवानें म्हणती सारे; मला न पटतें§ कांहिं म्हणा !
सुधारलेले बडे भिकारी हमाल पैदा करणारीं,
यंत्रमंदिरें, गिरण्या, गांद्या यांना म्हणतों खरोखरी !

---

१ फर्ग्यूसन कॉलेज. २ उत्तरेल'. ३ शेतकी व सायन्स हीं कॉलेजें.

§ पुष्कळांना माझें हें म्हणणें ऐकून सखेदाश्चर्य वाटेल. पण त्याला उपाय नाहीं. जसें माझें ' प्रामाणिक ' मत आहे, तसें मीं लिहिलें आहे. प्रख्यात वनस्पतिशास्त्रज्ञ भारतभूषण जगदीशचंद्र बोस, भूगर्भशास्त्रज्ञ बालमूर्ति आनंद मोहन व साहित्य सम्राट् रवींद्रनाथ ठाकूर या वंगदेशीय अतुलप्रज्ञ, कल्पक, व शोधक त्रिमूर्ती मनश्चक्षू पुढें आणिल्या म्हणजे खरें उंची शिक्षण कोणाला मिळत आहे, याची पुरोपुर अटकळ होऊन माझ्या म्हणण्यांत अल्पस्वल्प तरी तथ्यांश आहे असेंच पूर्ण विचारांतीं सर्वांच्या प्रत्ययास येईल.

प्रावरंबी अजागळें,
घलो नेभळ,
लुळे आंधळे,
काड्यामोड्यांची औतें,
पाण्यांचे जणुं दिसती पितें,
वायू उडवी अशीं भुतें,
निम्या गांवच्या गेल्या त्यांच्या आजाचि मसणीं जणुं पुढतीं !

१६

ईशान्येला राजमंदिरापरी दिसे जो अजब् महाल,
दर्यावाणी दिसे वरोनी शिल्पाची ही बहार विशाल !
पोटभरूचा हमालखाना-तुरुंग-वाडा तसा नवा,
कोणी म्हणतो तया संप्रती, काय आंतली वर्णुं हवा !
आरंभाला कीं अकराला हमाल हजरी होत असे,
दिवेलागणीं तेथुन सुटती, चरकीं पिळिले ऊस जसे !
बोलाया नाहीं उजरी,
जावया चोरी,
अशी शिरजोरी,
टाकांचीं उमदीं घोडीं,
मारिती तुरुतुरू दौडी,
वानुं मी काय ती प्रौढी ?
आंखे चोळितां आंखे मोडितां बसे हाहि त्या स्थलिं विमती !

१७

अस्तगिरीवर चढुनि दिवाकर पश्चिमसागरजलीं तलीं—
जों न उडी घे, पुण्यपुरीवर टाकी निजकर नमोवळी !
क्रमाक्रमांनीं पदापासुनी अमल विषाचा पुरा बसे,
सजीवतेची उगीच धुगधुगी तोंडावरती मात्र दिसे;

१ डोळे २ अकडे.

तोंडावरती प्रेतकळा ती आली आतां हळ हळ,
पवनिलाही विषार चढला, तिला लागलें तिमिर गिळूं,
नैराश्याच्या विषें महा,
केलें स्वाहा,
दुनियेस पहा,
तिमिरापोटीं प्रभा जशी,
नैराश्याचे म्हणति कुशीं,
आशा जन्मे दिव्य तशी,
भाविकाल तो कसा तुझा तुज ठाउक देवा उमापती !

महाशिवरात्रि शके १८४१

काव्य नं. ५०

मराठी ग्रंथ संग्रहालय
ग्रा. क्र. ७१८०६....

REFBK-0001806

REFBK-0001806

# ‘अनंततनयां’ च्या इतर काव्यकृति.

**श्रीशारदा दूतिका**—[ पूर्वार्ध ] किं १ आणा. ट. हं. ०॥

**सदर**—[ उत्तरार्ध ] किं. २ आणे ट. हं. ०॥

**श्रीमन्महाराष्ट्र भगवद्गीता**—[ मूळासहित ] किं. दहा आणे व्ही. पी. नें ०।२

**झोंपाळ्यावरची गीता**—[ मुलांना उत्कृष्ट खाऊ ] किं. चार आणे व्ही. पी. नें ०६

**बालगीता**—[ पूर्वार्ध अध्याय १ ते ९ ] ( मुलांना उत्कृष्ट खाऊ ) किं. दहा आणे व्ही. पी. नें ०।२

**सदर**—[ उत्तरार्ध अध्याय १० ते १८ ] श्रीगोकुळअष्टमीला तयार होईल.

* **हृदयतरंग**—[पुस्तक १ लें] किं. दहा आणे व्ही. पी. नें ०।२.

**सदर**—[ पुस्तक २ रें सचित्र ] किं १०४ व्ही.पी. नें १०६

**अंतर्विद्ध कलिका**—[एक सामाजिक चित्र] किं.०२ व्ही.पी.नें ०४

**विनायकाची कविता**—[ किं. १ रुपाया व्ही. पी. नें १०२

या सर्व पुस्तकांवर विद्वानांचे सुंदर अभिप्राय आहेत.

* हें पुस्तक शाळा खात्यानें लायब्ररीयांकरितां व बक्षिसाकरितां मंजूर केलें आहे.

**म्यानेजर ‘चित्रशाळा’**
१०२६ सदाशिव पेठ ,पुणें शहर.